परभणी-हिंगोली
सकाळ TODAY

नांदेड, शनिवार, ९ मे २०२६

SakalNews SakalMediaNews esakal.com TOLL FREE: 9881 598 815

गोदापात्रातून जेसीबीने वाळूचा अवैध उपसा

मानवत : वांगी शिवारातील गोदापात्रातून मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या वाळूच्या अवैध उपशामुळे पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले आहे. या प्रकारामुळे स्थानिक नागरिक, शेतकऱ्यांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मार्चपासून सुरू झालेल्या या प्रकारात वाळूमाफिया जेसीबी, पोकलेन व इतर यांत्रिक साधनांद्वारे पर्यावरण संकटात टाकत आहेत. रात्री मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा सुरू असतो. नदीकाठावरून रोज शेकडो ब्रास वाळूची वाहतूक होत असून अनेक ट्रॅक्टर व डंपर विनापरवाना धावत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यामुळे नदीपात्र अधिक खोल होत असून भविष्यात पूरस्थिती आणि भूजलपातळीवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पान २ वर...

लुटीतून वरकमाई, घरभाडे भत्त्याचीही मलई !

बोगस प्रमाणपत्राआधारे गावात न राहता उचलतात घरभाडे

ग्राऊंड रिपोर्ट पालम तालुका

पालममध्ये शेतकऱ्याची फरफट, 'रायटरराज'मुळे तीव्र संतप्त

■ मारोती नाईकवाडे

कुठेय तलाठी?

पालम, ता. ८ : मुख्यालयी राहण्याचे निर्देश असतानाही तलाठी शहरात राहतात. गावातील एखाद्याकडून गावातच राहत असल्याचे बोगस प्रमाणपत्र घेऊन घरभाडे उचलण्याचा सर्रास प्रकार तलाठ्यांकडून होत आहे. गावात तलाठी राहतो का? याची शहानिशा न करताच त्यांना घरभाडे दिले जात आहे. याकडे वरिष्ठ अधिकारीही डोळेझाक करतात. मुख्यालयी राहणाऱ्या तलाठ्यांना शासनाकडून घरभाडे दिले जाते. पण, बहुतांश तलाठी शहराच्या ठिकाणी राहतात. त्यांची अनधिकृत कार्यालयेही शहरात आहेत. मात्र, बोगस प्रमाणपत्र सादर करून शासनाकडून नियमित घरभाडे घेतले जाते. ही एक प्रकारे शासनाचीच फसवणूक आहे. सर्वसामान्य नागरिकांची कागदपत्रांसाठी अडवणूक करायची, डमींमार्फत पैसे लाटायचे आणि वरून शासनाचीही फसवणूक करून घरभाडे भत्ता खिशात घालायचा, असा हा प्रकार वरिष्ठांना दिसत नाही का, असा संतप्त सवाल नाडलेल्या शेतकरी, नागरिकांमधून विचारला जात आहे.

मागास तालुका अशी ओळख असलेल्या पालममध्ये महसूल प्रशासनाचा कारभार अक्षरशः 'रामभरोसे' सुरू असल्याचे धक्कादायक चित्र आहे. तालुक्यात एकूण २७ सजांचा समावेश असून तब्बल ८० गावांचा कारभार केवळ २० तलाठी आणि काही मंडळ अधिकाऱ्यांवर चालतो. मात्र, शासनाने सजांवर राहण्याचे स्पष्ट आदेश दिलेले असतानाही अनेक तलाठी ग्रामीण भागात न राहता तालुक्याच्या ठिकाणी किंवा जिल्ह्यात मुक्काम ठोकून अपडाउन करतात. परिणामी गावातील कार्यालये ओस पडली असून शेतकऱ्यांना दिवसभर चकरा माराव्या लागत आहेत.

साहेब नाहीत, रायटरकडे जा!

शेतकरी कार्यालयात पोचला की साहेब गायब, आणि त्यांच्या जागी खासगी रायटरच कारभार सांभाळताना दिसतात. सातबारा, फेरफार, वारसा नोंद, विहिरीची नोंद, हक्कसोड पत्र, न्यायालयीन निकालाची अंमलबजावणी, प्लॉट नोंदी अशा प्रत्येक कामासाठी ठराविक 'रेट कार्ड' तयार केले आहेत. अनेक शेतकऱ्यांना आपल्या गावाचा तलाठी नेमका कोण आहे, हेही माहिती नसल्याची संतप्त प्रतिक्रिया ग्रामीण भागातून उमटत आहे.

पीककर्जाच्या कागदपत्रांसाठी अडवणूक

मॉन्सूनपूर्व काळात खत-बियाण्यांसाठी राष्ट्रीयकृत बँकांकडून पीककर्ज घेण्यासाठी शेतकऱ्यांना सातबारा, फेरफार आणि इतर कागदपत्रांची गरज भासत आहे. मात्र, तलाठी कार्यालयात कर्मचारीच हजर नसल्याने दिवसभर फिरूनही काम होत नसल्याने शेतकऱ्यांत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

> प्रत्येक सजामध्ये बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली तातडीने लागू करण्याची गरज आहे. तलाठी व मंडळ अधिकारी सजावर उपस्थित राहिले तरच शेतकऱ्यांची कामे वेळेत होतील. अन्यथा शेतकऱ्यांची अशीच फरफट सुरू राहील.
> **- गजानन देशमुख**, सामाजिक कार्यकर्ते, पालम

उदाहरण एक

कामचुकारपणामुळे शेतकरी संतप्त

पालम : तालुक्यातील तलाठ्याच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्यांचे वारसा फेर व इतर महत्त्वाची कागदपत्रे गेल्या चार ते पाच महिन्यांपासून प्रलंबित पडल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. तलाठी गावाकडे फिरकत नसल्याने नागरिकांना अक्षरशः हेलपाटे मारावे लागत आहेत. साध्या कागदपत्रासाठीही संबंधित तलाठी एक हजार रुपयांची मागणी करत असल्याच्या तक्रारी आहेत.

उदाहरण दोन

साहेब, काम कधी होणार हो! ग्रामीण भागातील अनेक शेतकरी कामानिमित्त तालुक्याच्या ठिकाणी खासगी जागेमध्ये वास्तव्य असलेल्या तलाठ्याकडे जातात; परंतु या ठिकाणी अनेकदा चकरा मारूनही आपल्या हातातील काम अर्थपूर्ण व्यवहार झाल्याशिवाय होत नसल्याने शेतकरी ग्रस्त झाले आहेत.

रायटरच बनले कारभारी

पालम तालुक्यातील शेतकरी कामानिमित्त तलाठ्याकडे आले असता तलाठी भेटण्याऐवजी त्यांच्या हाताखालील खाजगी व्यक्तीच्या माध्यमातून आर्थिक देवाण-घेवाण केल्याशिवाय संबंधित शेतकऱ्याचे काम होत नसल्याची तक्रार ऐकायला मिळत आहे.

नागरिकांना आवाहन

तलाठ्याशिवाय महसूलच्या कामाचे पानही हलत नाही. त्यामुळे नागरिकांचा कुठल्या ना कुठल्या कामासाठी तलाठ्यांशी संपर्क आलेला असतोच. पैसे दिल्याशिवाय एकही काम होत नाही, याचा अनुभव अनेकांना आलेला आहे. यातून सर्वसामान्यांना होत असलेल्या त्रासाला `सकाळ ने वाचा फोडली असून कुठेय तलाठी? ही रोखठोक वृत्तमालिका सुरू केली आहे. आता नागरिकांनीही पुढे येण्याची गरज आहे. तलाठी, त्याने वसुलीसाठी ठेवलेल्या डमीकडून आलेला कटू अनुभव, एखादा प्रसंग, झालेला त्रास, रेंगाळलेले काम याविषयी सविस्तर लिहून `सकाळे कडे पाठवा. याला आम्ही ठळक प्रसिद्धी देऊ.

संपर्कासाठी क्रमांक

- गणेश पांडे : ९७६७५७११११
- शिवाजी वाघमारे : ९८५०८१००२६
- अमोल कुलकर्णी : ९८८१६६५५७७
- अनंत रेनगडे : ९८८१८६९६०५

सकाळ भूमिका

तलाठ्यांनो, सामान्यांचे तळतळाट पचवणार कसे?

गावगाडा हाकणाऱ्या कारभाऱ्यांमधील तलाठी हा एक महत्त्वाचा घटक. सातबारा काढण्यापासून ते सातबाऱ्यावर मालकी हक्क चढविण्यापर्यंत प्रत्येक व्यवहारात तो गरजेचाच. कधीकाळी लोकसेवेसाठी तत्पर असलेला हाच तलाठी आता मात्र अनिर्बंध स्वातंत्र्य भोगतो आहे. सर्वसामान्यांची अडवणूक करून वारेमाप वसुली करण्यात त्याला धन्यता वाटते आहे. त्याला ना जिल्हाधिकाऱ्यांची भीती, ना मंत्र्यांची. असं का होत आहे, याचा विचार राज्य सरकार का करीत नाही? तलाठ्यांच्या वसुलीचे 'रेटकार्ड' अख्ख्या तालुक्याला माहिती असते. परंतु, ते जिल्हाधिकारी आणि महसूलमंत्र्यांना माहीत नसते, यावर कुणाचा विश्वास बसेल का? म्हणूनच सरकारने या लुटीला अधिकृत म्हणून मान्यता द्यावी. तसेच तलाठ्यांचे लुटीचे रेटकार्डही कार्यालयात लावण्याची मुभा द्यावी. म्हणजे सामान्य माणसाला हा व्यवहार सवयीचा होऊन जाईल. तलाठ्यांनी स्वत:च्या मदतीसाठी नेमलेल्या बेकायदा डमी तलाठ्यांच्या तऱ्हा तर आणखी वेगळ्या. असा हा बेबंद कारभार सुरू असतो. तरीही त्यांच्यावर कारवाईसाठी कुणीही धजावत नाही. सर्वसामान्यांची लूट करण्यासाठीच हे पद निर्माण केले की काय, असं वाटावं इतपत या लोकांमधला निलाजरेपणा सोकावला आहे. शंभर रुपयांत होणारे महसूलमधील काम जेव्हा लाखांवर जाते, तेव्हा सामान्य माणूस या लुटारूंना तळातळाटाशिवाय दुसरं काहीच देत नाही. नंतर या तळातळाटाला कोणता रंग चढतो आणि तो कुठे वाहतो, हे तलाठ्यांना चांगलेच ठाऊक आहे. जर सरकारला यांची थेरं बंद करता येत नसतील, तर ही लूट 'सकाळ'च्या माध्यमातून आम्ही चव्हाट्यावर आणणार आहोत.

■ संपादक

शासन आदेशाला केराची टोपली

तलाठी हे क्षेत्रीय स्तरावरील सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे पद आहे. जनतेस आवश्यक असलेल्या दाखल्यांसाठी तलाठी कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. तसेच ई-पीक पाहणीची नोंदणी करणे, नुकसानीचे पंचनामे, दुष्काळ, अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती इत्यादी प्रसंगी मदत व पुनर्वसनाचे काम तलाठ्याला करावे लागते. परंतु, तलाठी सजाच्या ठिकाणी राहत नसल्याच्या तक्रारी शासनाकडे आहेत. यातूनच शासनाने तलाठ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहण्याबाबत वर्ष २०२३ मध्ये आदेश काढला होता. त्या आदेशालाही तलाठ्यांकडून 'केराची टोपली' दाखवली जात आहे.

UNITED STUDIES MBBS CONSULTANTS



ग्रॅन्ड MBBS प्रवेश सेमिनार 2026

भारत व परदेशातील MBBS प्रवेशाचे संपूर्ण मार्गदर्शन

- NEET स्कोरनुसार भारतात कोणते मेडिकल कॉलेज मिळेल ?
- भारत vs परदेश - सर्वोत्तम पर्याय निवड मार्गदर्शन
- MCC व स्टेट काउन्सेलिंग प्रक्रिया स्टेप बाय स्टेप माहिती

फ्री सेमिनार – ही संधी चुकवू नका !

हिंगोली REGISTER NOW

दिनांक : रविवार, 10 मे 2026

वेळ : सकाळी 11:00 ते दुपारी 1:30 - सेमिनार

पर्सनल काउन्सेलिंग सेशन : दुपारी 2:00 ते सायं 6:00

स्थळ : हॉटेल शिवलिला सेलिब्रेशन, अकोला रोड, हिंगोली

तज्ञ मार्गदर्शनासह तुमची MBBS सीट निश्चित करा.

84599 83893 | 76204 45431

ऑफिस पत्ता : 804 B विंग, लोकमत बिल्डिंग, नागपूर

ANUP

परभणी जिल्हा विभागात अव्वल निकाल ९०.०२ टक्के

परभणी, ता. ८ : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल शुक्रवारी (ता. आठ) जाहीर झाला. छत्रपती संभाजीनगर विभागात परभणी जिल्ह्याने निकालात अव्वल स्थान पटकावले आहे. जिल्ह्याचा निकाल सर्वाधिक ९०.०२ टक्के लागला असून निकालात पुन्हा एकदा मुलीच सरस ठरल्या असून उत्तीर्णतेचे प्रमाण (९४.३८) टक्के तर मुलांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण (८६.३०) टक्के आहे.

दहावीच्या दहावी परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान झाल्या. मंडळाच्या सूचनेनुसार प्रत्येक दालनात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले तर परीक्षेदरम्यान भरारी पथके, बैठी पथके तैनात करण्यात आली होती. ज्या केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते तेथे पर्यवेक्षांची अदलाबदल केली होती. त्यामुळे परीक्षेदरम्यान एकही गैरप्रकार आढळून आला नव्हता. फक्त परीक्षक/नियामकांनी चार प्रकरणे निदर्शनास आणून दिली आहेत.

विभागात प्रथमच यश

जिल्ह्याचा निकाला विभागात सर्वाधिक ९०.०२ टक्के लागला. छत्रपती संभाजीनगर (८९.३१), बीड (८९.७२), जालना (८५.९०) तर हिंगोली जिल्ह्याचा निकाल सर्वांत कमी ८३.२६ टक्के लागला. विभागात परभणीने प्रथमच अव्वल स्थान पटकावल्याने शिक्षण क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

जिल्ह्यात परभणी तालुका सरस

■ परभणी तालुक्यातील १० हजार ९३ पैकी नऊ हजार २२७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्णतेचे हे प्रमाण ९१.४१ टक्के आहे. पूर्णा तालुक्यातील दोन हजार ५१६ पैकी दोन हजार १९७ म्हणजे ८७.३२ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. गंगाखेड तालुक्यातील तीन हजार ३०५ पैकी दोन हजार ९२७ म्हणजे शेकडा ८८.५६ टक्के, पालम तालुक्यातील एक हजार ३७६ पैकी एक हजार २०१ म्हणजे ८७.२८ टक्के, सोनपेठ तालुक्यातील एक हजार ४७ पैकी ९३५ म्हणजे ८९.३० टक्के, जिंतूर तालुक्यातील चार हजार १०७ पैकी तीन हजार ७२६ म्हणजे ९०.७२ टक्के, पाथरी तालुक्यातील एक हजार ९३८ पैकी एक हजार ७६८ म्हणजे ९१.२२ टक्के, मानवत तालुक्यातील एक हजार ५२८ पैकी एक हजार ३५६ म्हणजे ८८.७४ टक्के तर सेलू तालुक्यातील दोन हजार ४८३ पैकी दोन हजार २२५ म्हणजे ८९.६० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

सात हजारावर विद्यार्थ्यांना विशेष प्रावीण्य

जिल्ह्यातील सात हजार ३४४ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य म्हणजे ७५ टक्क्यां पेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत. प्रथम श्रेणीत आठ हजार २१२, द्वितीय श्रेणीत सात हजार १७६ तर दोन हजार ८३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

२५ हजारांवर विद्यार्थी उत्तीर्ण

■ जिल्ह्यातील एकूण २८ हजार ७६१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २८ हजार ३९३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली व त्यापैकी २५ हजार ५६२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्णतेचे हे प्रमाण ९०.०२ टक्के आहे. जिल्ह्यात मुलींचा निकाल पुन्हा एकदा मुलांपेक्षा सरस ठरला असून मुलींचे उत्तीर्णतेचे प्रमाण ९४.३८ टक्के इतके नोंदवले गेले, तर मुलांचे प्रमाण ८६.३० टक्के राहिले.

आम्ही वाचतो सकाळ

माझा अनेक वर्षांपासून 'सकाळ'शी स्नेह जडला आहे. दिवसाची सकारात्मक आणि आश्वासक सुरुवात या वर्तमानपत्रामुळे होते अशी आमची भावना आहे. बातम्या वस्तुनिष्ठ, सखोल आणि विश्वासार्ह असतात. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक तसेच ग्रामीण भागातील प्रश्नांवरील वार्ताकन आवडते. विशेषतः विद्यार्थ्यांसाठी असलेले शैक्षणिक मार्गदर्शन, करिअरविषयक माहिती आणि चालू घडामोडींचे विश्लेषण खूप उपयुक्त ठरते. समाजातील विविध विषयांवर विचार करण्याची प्रेरणा मिळते. सुंदर मांडणी, सोपी भाषा आणि दर्जेदार पत्रकारितेमुळे 'सकाळ' हे माझे आवडते वर्तमानपत्र बनले आहे.



गणेश पाथरकर,
बँक अधिकारी, एसबीआय, पूर्णा

पंजाब नॅशनल बँक भारत सरकारचा उपक्रम | pnb | punjab national bank (A Govt. of India Undertaking)

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३१.१२.२०२५ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा- पीएनबी - हिंगोली (७९०४००) कर्जदार - मे. गणराज कृषी केंद्र दिग्रस कऱ्हाळे** पत्ता - मालमत्ता नं. १५४८, मेन रोड, दिग्रस (के.) ता. हिंगोली, जि. हिंगोली-४३१७०५ **प्रोप्रायटर श्री. माधव किसन कऱ्हाळे** पत्ता - व्हीपीओ दिग्रस कऱ्हाळे, ता. हिंगोली, जि. हिंगोली - ४३१ ७०५ **जामीनदार / तारणदार - श्री. साहेबराव किसनराव कऱ्हाळे** पत्ता - व्हीपीओ दिग्रस कऱ्हाळे, ता. हिंगोली, जि. हिंगोली - ४३१ ७०५	१. मालमत्ता नं. १५४८, सर्व्हे नं. १२११, मेन रोड, दिग्रस (कऱ्हाळे), ता. आणि जिल्हा हिंगोली. क्षेत्रफळ एरिया ३५० स्क्वे.मी. (अंदाजे) **मालकी हक्क - श्री. माधव किसन कऱ्हाळे चतुःर्सिमा - पुर्व -** सरस्वती गिरीची जमीन , **पश्चिम -** सावली रोड, **दक्षिण -** शिवचरण गिरी यांची जमीन, **उत्तर -** रामचंद्र सोनाजी काळे यांची जमीन **मालमत्ता आयडी - PUNB7NZ78227198** २. मालमत्ता नं. ५७६, मेन रोड, दिग्रस (कऱ्हाळे), ता. आणि जिल्हा हिंगोली. **क्षेत्रफळ एरिया १११.४८ स्क्वे.मी. मालकी हक्क - साहेबराव किसनराव कऱ्हाळे चतुःर्सिमा - पुर्व -** श्री. शिवाजी प्रभुजी कऱ्हाळे यांची मालमत्ता,**पश्चिम -** रस्ता, **उत्तर -** श्री. गणपती सुरुशे यांची मालमत्ता, **दक्षिण -** श्री. रमेश कऱ्हाळे यांची गल्ली मालमत्ता **मालमत्ता आयडी - PUNB7NZ78234317**	**अ) १८.०५.२०२४ पेपर प्रसिध्दी दिनांक १३.०७.२०२४ ब) रु.३०,८३,४०२.२४ + इतर व्याज श्री क) २५.०९.२०२४ ड) सांकेतिक ताबा**	१. अ) रु. १९.३३ लाख ब) रु. १.९३३ लाख (२६.०५.२०२६) क) रु. ०.१० लाख १. अ) रु. १०.४८ लाख ब) रु. १.०४८ लाख (२६.०५.२०२६) क) रु. ०.१० लाख	**दि. २६.०५.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत**	**माहित नाही**

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, **26.05.2026** @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर **https://baanknet.com** वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाटी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया **www.pnb.bank.in.** आणि **https://baanknet.com** ही वेबसाईट पाहावी

दिनांक - ०९.०५.२०२६
स्थळ - नाशिक

टीप : स्वैर भाषांतर; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य

स्वाक्षरी/-
श्री. सजील कुमार
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)

